| Newspaper | Page No. | Date |
|---|---|---|
| Samachar | 02 | 17-07-2014 |

# एस्सार स्टीलद्वारा अंध विद्यार्थ्यांसाठी ऑडियो वर्णीत चित्रपटाचे कोरेगाव येथे आयोजन



पुणे, दि. १७ (प्र.) : मे. एस्साउर स्टील इंडिया लिमिटेड कंपनीच्या सामाजिक बांधीलकी प्रकल्पाचा भाग म्हणून एस्सार ग्रुप फाऊंडेशनद्वारे अंध विद्यार्थ्यांसाठी विशेष ऑडीयो वर्णित चित्रपटाचे आयोजन अंध शाळा कोरेगाव पार्क करण्यात आले. एस्सार ग्रुप फाऊंडेशन ही एस्सार कंपनी समूहाची सामाजिक बांधिलकी प्रकल्प राबवणारी संस्था असून त्याद्वारे भारतातील विविध ठिकाणी वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविले जातात. याद्वारे पुणे अंधशाळेतील विद्यार्थ्यांना 'थ्री इडियट्स' हा गाजलेला सिनेमा ऑडीयो वर्णित तंत्रज्ञानाचा वापर करुन दाखविण्यात आला. हा सिनेमा विशेषतः अंध व्यक्तीसाठी ऑडीओ संपादित करुन तयार केलेला होता. यामध्ये पडद्यावरील सिनेमातील शांत दृश्ये किंवा इतर दृश्ये ऑडीओ वर्णित संपादन केल्यामुळे त्यांना इतर व्यक्तीच्या मदतीशिवाय सिनेमाचा आंनद घेतो. या कार्यक्रमा दरम्यान अंध मुलासोबतच डोळस व्यक्ती डोळ्याला पट्टी बांधून या विशेष ऑडीओ वर्णित सिनेमा घेतला व यामधून त्यांच्यामध्ये अंधजनाच्या समस्याबद्दल संवेदना होण्यास मदत झाली. हा सिनेमा अनुभवून तेथील आदेश भालेराव यांनी 'सिनेमा विशेषतः आमच्यासाठी तयार केला याबद्दल संस्थाला धन्यवाद दिले तसेच हा सिनेमा ऑडीओ वर्णित टेक्नॉलॉजी असल्यामुळे जास्त आनंद घेता आला व असे मत व्यक्त केले' तसेच हा सिनेमा इतर मुलांना दाखविण्यात यावा विनंती केली.

कंपनीचे प्रमुख कार्यकारी अधिकारी मितेश शहा सर यांनी 'हा कंपनीचा उपक्रम चांगला असून अशाप्रकारचे अनेक उपक्रम विशेषतः अंध मुलांसाठी राबविणार असल्याचे मत व्यक्त केले.'